दैनिक

# अट्टल संकेत

ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com

RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३४७ ■ मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

## बंजारा समाजात रावणासुरी कृत्य करणाऱ्या रविकांत राठोड यांना अटक करण्यास विलंब का?

### रावणासुरी रविकांत राठोड यांना वाचवणारे मंत्री कोण ?

**छत्रपती संभाजीनगर / विशेष प्रतिनिधी :**

बंजारा समाजातील भोळ्या भाबड्या महिला व पुरुषांना बंजारा ब्रिगेड संघटनेमार्फत पाहिजे ती कामे मिळवून देण्याचे आमिष दाखवून चांगल्या घरच्या किंवा कामगार स्त्री-पुरुषांना सुशिक्षित युवकांना आपल्या जाळ्यात अडकवून यापूर्वी अनेक महिलांचे शोषण करणारे स्वयंघोषित राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत अंबादास राठोड यांच्या रावणासुरी कारणामुळे शहरातील काही पोलीस ठाण्यात यापूर्वी गुन्हे दाखल झालेले असतानाही अटक न झाल्याने लोकांना धमकावणे, ब्लॅकमेल करणे, अपहरण करणे, खोट्या गुन्ह्यात अडकविण्याची भीती दाखवून काही ना गप्प बसविण्याचे प्रकार रविकांत राठोड (रावणासुर) काही मंत्री महोदयाच्या मदतीने करीत आहे. त्यांच्याविरुद्ध जाणाऱ्या किंवा त्यांच्या रावणासुरी प्रवृत्तींना विरोध करणाऱ्यांना जीवे मारण्याची किंवा खोट्या गुन्ह्यात गुंतवून हलाहल करण्याची घाणेरडी पद्धत अवलंबित असल्याचे प्रकार 'दैनिक अट्टल संकेत'कडे उपलब्ध झालेले आहे.

बंजारा समाजात अनेक सामाजिक संघटना कार्यरत असतानाही रावणासुरी प्रवृत्तीच्या रविकांत राठोड यांच्याविरुद्ध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते गप्प का आहेत ?

बीड येथून छत्रपती संभाजीनगर येथे येऊन बीडची गुंडगिरीची प्रवृत्ती संपूर्ण महाराष्ट्र राज्यात निर्माण करण्याचा प्रयत्न रावणासुरी रविकांत राठोड हे करीत आहेत.



रावणासुरी रविकांत राठोड यांच्या गुंडगिरी, ब्लॅकमेलिंग, महिलांचे अपहरण, महिलांच्या शोषणाचे अनेक पुरावे काही सामाजिक कार्य करणाऱ्यांकडे असताना संबंधित पदाधिकारी किंवा कार्यकर्ते गप्प का?

रावणासुरी रविकांत राठोड यांच्याविरुद्ध भूमिका घेणाऱ्यांना गप्प बसविण्यासाठी बंजारा ब्रिगेड संघटनेतील भोळ्या भाबड्या समाज बांधवांचा वापर केल्याचे प्रकार यापूर्वी घडलेले असतानाही त्यांना यापूर्वी अटक का झालेली नाही ? बंजारा समाजातील अनेकांना लुबाडणाऱ्या रावणासुरी रविकांत राठोड यांना कोण कोणत्या मंत्रींचा वरदहस्त लाभला?

आणि कोणत्या लालचेने मदत करतात याची माननीय मुख्यमंत्री महोदयांनी चौकशी सुरू केल्यास काही मंत्र्यांनाही रावणासुरी रविकांत राठोड यांच्यासोबत तुरुंगाची हवा खावी लागेल यात शंकाच नाही.

रावणासुरी रविकांत राठोड यांच्याविरुद्ध यापूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्याचे काय झाले? कोणत्या कारणाने सदर गुन्हे दडपले गेले याची राज्याचे माननिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांनी चौकशी करून दोषीं आढळणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करून बंजारा समाजातील पिळले जाणाऱ्यांना न्याय देतील का?

रावणासुरी रविकांत राठोड यांच्या असुरी कारनाम्याला वेळीच पोलीस प्रशासनाने आळा न घातल्यास महाराष्ट्रातील अनेक महिलांची घरे उध्वस्त होऊन काही महिलांचे प्राण गेल्यास त्याला सर्वस्वी रावणासुरी रविकांत राठोड जबाबदार राहतील.

असे बंजारा समाजातील महिलांनी अटलमतकडे आपल्या प्रतिक्रिया दिलेल्या आहेत. त्यामुळे राज्य शासनाने पोलीस प्रशासन रावणासुरी रविकांत राठोड यांच्याविरुद्ध काय कार्यवाही करतात याकडे बंजारा समाजातील अनेक सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते लक्ष ठेवून आहेत. याशिवाय रावणासुरी रविकांत राठोड यांचे असुरी कारनाम्याचे बरेच पुरावे 'दैनिक अट्टल संकेत'कडे उपलब्ध झालेले असल्याने बंजारा समाजातील समाज बांधवांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्धचे कारनामे उघड करून शासन व पोलीस प्रशासनाला रावणासुरी रविकांत राठोड यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यास निश्चितच भाग पाडेल. अशी अपेक्षा बंजारा समाज बांधव करू लागले आहेत. त्यामुळे रावणासुरी रविकांत राठोड यांना पोलीस अटक करतात की मंत्री महोदयाच्या दबावाखाली पाठीशी घालतात हे लवकरच दिसून येईल यात शंकाच नाही.

## जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी, जनजीवन विस्कळीत



काश्मीर, २० एप्रिल - जम्मू-काश्मीरमध्ये काही दिवसांपासून पाऊस कोसळत आहे. या मुसळधार पावसाचा फटका अनेक नागरिकांना बसत आहे. दरम्यान आज, रविवारी ढगफुटी सदृश्य पाऊस पडल्यामुळे जनजीवन अधिकच विस्कळीत झाले आहे. या मुसळधार पावसामुळे जम्मू-काश्मीरच्या रामबनमध्ये पूरस्थिती निर्माण झाली. या लोंढ्यात तिघांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता आहे तर अनेक जण जखमी झाले आहेत. सुमारे ४० घरांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

अचानक आलेल्या ढगफुटी सदृश्य पावसाच्या परिस्थितीमुळे रामबन जिल्ह्यात परिस्थिती बिकट झाली आहे. दोन हॉटेल्स, काही दुकाने आणि काही घरांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. तसेच अनेक ठिकाणी भूस्खलनामुळे राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आले आहेत. तसेच रामबन जिल्ह्यातील चिनाब नदीजवळील धर्मकुंड गावात भूस्खलन झाले असून, १० घरे पूर्णपणे खराब झाली असून, सुमारे ४० घरांचे नुकसान झाले आहे. तर ढगफुटीनंतर बचाव पथकाकडून बचावकार्य सुरू असून, शेकडो नागरिकांना वाचवण्यात यश आले आहे. आतापर्यंत ५०० जणांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

दरम्यान, भारतीय हवामान विभागाच्या मते, जम्मू आणि काश्मीरमध्ये पुढील दोन ते तीन दिवस पाऊस सुरु राहण्याची शक्यता आहे. विशेषतः डोंगराळ आणि उंच भागात गडगडाटी वादळासह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रामबन, उधमपूर, पुंछ आणि बारामुल्ला जिल्ह्यात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तसेच येथील लोकांना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

दरम्यान मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी म्हटले आहे की, जम्मू-काश्मीरमधील रामबनमध्ये झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या घटनेने मला खूप दुःख झाले आहे. या कठीण काळात माझ्या संवेदना पीडित कुटुंबांसोबत आहेत. स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात आहे, जेणेकरून मदत आणि बचाव कार्य त्वरित पार पाडता येईल.

## पंतप्रधान मोदी २२-२३ एप्रिलला सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील आठवड्यात सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर जाणार आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी सौदी अरेबियाचे काऊन प्रिन्स आणि पंतप्रधान मोहम्मद बिन सलमान यांच्या निमंत्रणावरून २२-२३ एप्रिल रोजी सौदी अरेबियाला भेट देणार आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा हा तिसऱ्या काळातील देशातील पहिला दौरा असेल. यापूर्वी पंतप्रधान मोदी २०१६ आणि २०१९ मध्ये सौदीच्या अधिकृत दौऱ्यावर गेले होते. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सप्टेंबर २०२३ मध्ये क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांच्या नवी दिल्लीच्या राजकीय भेटीनंतर पीएम मोदी सौदीच्या दौऱ्यावर जाणार आहे. क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी सप्टेंबर २०२३ मध्ये ऋ२० शिखर परिषदेला उपस्थिती लावली होती. यावेळी त्यांनी भारत-सौदी अरेबिया स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप कौन्सिलच्या पहिल्या बैठकीचे सह-अध्यक्षपद भूषवले होते. परराष्ट्र मंत्रालयाने एका अधिकृत प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, धोरणात्मक भागीदार म्हणून, दोन्ही देश राजकीय, संरक्षण, सुरक्षा, व्यापार, गुंतवणूक, ऊर्जा, तंत्रज्ञान, आरोग्य, शिक्षण, संस्कृती आणि लोकांमधील संबंध यासह विविध क्षेत्रात मजबूत द्विपक्षीय संबंध सामायिक करतात. गेल्या अनेक वर्षांपासून भारत आणि सौदी अरेबियाचे संबंध ऐतिहासिक आहे.

## मुंबईचा आंतरराष्ट्रीय विमानतळ बंद राहणार

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. मे महिन्यातील ९ तारखेला छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ६ तासांसाठी बंद राहणार आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने याबाबत माहिती प्रसिद्ध केली आहे. धावपट्टीच्या तसेच इतर देखभालीच्या कामामुळे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथील विमान वाहतूक ९ मे २०२५ रोजी सहा तासांसाठी बंद ठेवले जाणार आहे. पावसाळ्याआधी हे काम पूर्ण केले जाणार आहे. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने याबाबत शनिवारी माहिती दिली. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेडने म्हटले आहे की, ०९/२७ आणि १४/३२ या दोन्ही धावपट्ट्यांवर पावसाळ्याआधी देखभालीचे काम हाती घेतले जाणार आहे. हे काम ९ मे रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत पूर्ण केले जाईल.

## 'एक्सरसाईझ डेझर्ट फ्लॅग-१०' बहुराष्ट्रीय युद्धसरावात भारतीय हवाई दल झाले सहभागी

नवी दिल्ली, २० एप्रिल - 'एक्सरसाईझ डेझर्ट फ्लॅग-१०' या महत्त्वाच्या बहुराष्ट्रीय युद्धसरावात सहभागी होण्यासाठी, भारतीय हवाई दलाची एक तुकडी संयुक्त अरब अमिरातमधील अल धाफ्रा एअर बेस येथे दाखल झाली. या सरावामध्ये भारतीय वायुदलाची मिग-२९ आणि जॅग्वार ही लढाऊ विमाने सहभागी होत आहेत.

एक्सरसाईझ डेझर्ट फ्लॅग हा संयुक्त अरब अमिरातींच्या हवाई दलाने आयोजित केलेला एक बहुराष्ट्रीय सराव असून यामध्ये भारतासह ऑस्ट्रेलिया, बहरीन, फ्रान्स, जर्मनी, कतार, सौदी अरेबिया, कोरियन प्रजासत्ताक, तुर्की, यूएई, युनायटेड किंगडम आणि अमेरिका या देशांची हवाई दले सहभागी होत आहेत. हा सराव २१ एप्रिल ते ८ मे दरम्यान आयोजित करण्यात आला आहे.





या सरावाचा उद्देश म्हणजे जगातील काही सर्वात सक्षम वायुदलांसह परिचालन ज्ञान आणि सर्वोत्तम प्रणालींची परस्परांमध्ये देवाणघेवाण करणे, तसेच गुंतागुंतीच्या आणि विविध प्रकारच्या लढाऊ मोहिमा एकत्रितपणे पार पाडणे. अशा प्रकारच्या सरावांमुळे सहभाग घेतलेल्या देशांमध्ये परस्पर सामंजस्य, आंतरपरिचालन क्षमता वाढते आणि सैन्य सहकार्य अधिक मजबूत होते.

भारतीय वायुदलाचा सहभाग हा भारताच्या या क्षेत्रातील तसेच जागतिक पातळीवरील मित्र देशांबरोबरच्या संरक्षण संबंधांना आणि आंतर-संचालन क्षमतेस बळकटी देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.

# टेस्ला: रोजगार निर्मितीला चालना

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि टेस्लाचे मालक इलान मस्क यांच्यात काल दूरध्वनीवरून चर्चा झाली. या चर्चेचा सारांश भारतात टेस्लाचा प्रवेश निश्चित करण्याचा होता आणि त्या दृष्टीने दोन्ही प्रमुखांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जगाला टॅरिफच्या धमकीने दहशतीत ठेवले असताना भारतीय पंतप्रधान अमेरिकन उद्योगपती मस्क यांच्याशी त्यांचा टेस्ला हा उद्योग भारतात विस्तारित करण्यासंदर्भात चर्चा करतो ही निश्चितच आशादायक बाब आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील उद्योगांमध्ये व्यापक चर्चा होऊ शकते आणि या दोन्ही बाबतीत प्रचंड वाव आहे, हे मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेतून स्पष्ट झाले आहे. जरी भारताचे अमेरिकेशी टॅरिफच्या मुद्यावरून संबंध बिघडलेले असले तरीही मोदी यांच्या म्हणण्यानुसार भारत अमेरिकेशी असलेली आपली भागीदारी पुढे नेऊ इच्छितो आणि मोदी यांनी हे स्पष्ट सांगितले आहे. मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेला या अर्थाने महत्त्व आहे कारण मस्क हेच सध्याच्या ट्रम्प प्रशासनात प्रभावशाली व्यक्ती म्हणून समजले जातात. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करणे हे भारतासाठी प्रचंड लाभदायक ठरू शकते. टेस्लाचे भारतातील आगमन यामुळे निश्चित झाले आहे असे समजले जाते. भारतातील अन्य विरोधी पक्षांनी टेस्लाच्या आगमनासाठी काही वर्षांपूर्वी पायघड्या घातल्या होत्या.

पण मस्क यांनी मोदी यांना पसंती दिली यावरून मोदी यांचे अमेरिकेशी आणि ट्रम्प यांच्याशी किती जिव्हाळ्याचे संबंध आहेत




ते लक्षात येते. मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेत अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर चर्चा झाली असे सांगण्यात आले. पंतप्रधान मोदी यांच्या स्वायत्ता धोरणाला प्रचंड महत्त्व आहे आणि भारताने कोणत्याही बाबतीत अमेरिकेच्या किंवा कोणत्याही देशाच्या दबावाखाली येऊन निर्णय घेतला नाही हे वास्तव आहे. भारताचे कोणत्याही देशाच्या दबावाखाली न येण्याचे धोरण लक्षात घेऊन मोदी वारंवार अनेक देशांचे दौरे करत असतात, पण काल मात्र त्यांनी दूरध्वनीवरून चर्चा केली. इलान मस्क यांना जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून गणले जाते. मोदी आणि मस्क यांच्यात तंत्रज्ञान आणि नावीन्यपूर्ण संशोधन यावर चर्चा झाली. ही चर्चा फलद्रूप झाली तर त्याचे परिणाम दोन्ही देशांसाठी आत्यंतिक होणार आहेत. भारताची अर्थव्यवस्था सध्या चांगल्या अवस्थेत असली तरीही तिच्यावर टॅरिफचे सावट आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी मस्क यांचा आधार भारताने शोधला तर त्यात वावगे काही नाही. टेस्लाच्या आगमनाने भारतीय बाजारपेठ उत्साहाने उचंबळून येणार आहे आणि भारतीय बाजारात नव्या गाड्यांचे आगमन होणार आहे आणि त्यामुळे सध्या जी बाजाराला विशेषतः विद्युत वाहनांच्या बाजारपेठेला मरगळ आली आहे ती जाणार आहे. त्यादृष्टीने मोदी आणि मस्क यांच्यातील चर्चेचे महत्त्व अपरंपार आहे. टेस्ला कार्स ज्या विद्युतवर चालतात त्यांच्या आगमनाची भारतात प्रचंड प्रतीक्षा आहे. त्यामुळे ही चर्चा जर खरोखरच यशस्वी झाली, तर भारतीय कार उद्योगासाठी ती क्रांती ठरेल. शिवाय मरगळलेल्या कार उद्योगासाठी टेस्लाचे आगमन ही सुखद वार्ता ठरेल, त्यादृष्टीने या चर्चेकडे सकारात्मक पद्धतीने पाहिले पाहिजे. पण त्यापेक्षा या चर्चेकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे ते सध्याच्या अमेरिकेच्या टॅरिफच्या धोरणाच्या संदर्भात.

मोदी आणि मस्क यांच्यात भारत आणि अमेरिका यांच्यातील संभाव्य सहकार्याबाबत चर्चा झाली ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. या चर्चेनंतर टेस्लाचे भारतातील आगमन निश्चित मानले जात आहे. त्यामुळे भारतातील बेरोजगारी कमी होण्यास मदत होणार आहे आणि अमेरिकेच्या जगभरात जो संताप व्यक्त होत आहे त्याला कुठेतरी आळा बसेल अशी दोन्ही देशांना आशा आहे. तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रात चर्चा झाली आणि त्यावर व्यापक सहमती होण्याची शक्यता आहे. मोदी यांच्यासारखा द्रष्टा पंतप्रधान लाभल्यामुळे देशाला कितीही मोठ्या संकटातून वाट काढून घेऊन जातो याचे हे उदाहरण आहे. या चर्चेचे फलित म्हणून या महिन्यात टेस्लाचे अधिकारी भारत दौऱ्यावर येणार आहेत. त्यात टेस्लाच्या आगामी आगमनासंबंधी तपशील निश्चित होईल. ही चर्चा त्यासाठीच होती असे सांगण्यात आले आहे. टेस्लाने भारतात तर भरती प्रक्रिया सुरू केली आहे अशीही चर्चा आहे. त्यामुळे विरोधक कितीही बोंबा मारोत किंवा भारताच्या सार्वभौमत्वासंदर्भात कितीही ओरड करोत, टेस्ला भारतात येणार आणि भारताला चांगले दिवस येणार हे निश्चित आहे, आता टेस्लाचे आगमन, तर निश्चित आहे. त्यामुळे भारतात आनंदाची लहर पसरणार आहे. कारण भारतातील विद्युत वाहनांची बाजारपेठ यामुळे प्रचंड उत्साहित झाली आहे. तसेच विद्युत वाहनांची खरेदी वाढणार आहे आणि त्यामुळे प्रदूषणाला आळा बसणार आहे.

मोदी आणि मस्क यांच्यातील या चर्चेकडे या सर्व प्रकारच्या सकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. मोदी आणि मस्क यांच्यात चर्चा झाली ती तंत्रज्ञान आणि सहकार्यावर झाली. या दोन्ही क्षेत्रात प्रचंड सहकार्याची बीजे आहेत हे दोघांनीही ओळखले. टॅरिफच्या सावटात भारत आणि अमेरिका यांनी एक होणे गरजेचे आहे हे भारताने ओळखले आहे तितकेच ते अमेरिकेने ओळखले आहे. कारण जितकी भारताला अमेरिकेची गरज आहे तितकीच अमेरिकेलाही भारताची गरज आहे आणि मस्क यांच्याबाबतीत तर असे सांगता येईल की, त्यांच्या कंपनीसाठी भारतासारखी विशाल बाजारपेठ दुसरी नाही. चीनची आता पूर्वीसारखी स्थिती नाही आणि त्यामुळे चीनच्या कार्स मग त्या कोणत्याही असोत विद्युत वाहने असोत की साध्या कार्स, आज त्यांना अमेरिकेची बाजारपेठ नाही. त्यामुळे टेस्ला यांना भारताची गरज आहे आणि भारतालाही टेस्लाही गरज आहे. त्यामुळे या चर्चेकडे दोघांनीही सकारात्मक दृष्टीने पाहिले आणि त्याचे परिणाम दोन्ही देशांसाठी चांगलेच होणार आहेत. या चर्चेचे स्वागत करायला हवे.

# अग्नीचे पावित्र्य राखणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी

आपल्या संस्कृतीमध्ये अग्नी पूजा हा अतिशय महत्त्वाचा संस्कार मानला जातो. त्यामुळे अग्नीचे पावित्र्य राखणे ही प्रत्येकाची नैतिक जबाबदारी आहे असे मला वाटते; परंतु प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही हे वारंवार लागणाऱ्या आगींमुळे उघड होणारे कटू सत्य आहे. आपत्ती समोर सर्व समान असतात. मग ती नैसर्गिक असो किंवा मनुष्य निर्मित असो. सदैव न्याय हक्कासाठी भांडणाऱ्या, आधुनिकतेचा ध्यास घेतलेल्या नागरिकांना तसेच विकासाची कास धरू पाहणाऱ्या प्रशासकीय यंत्रणांना अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन व्यवस्थापन या विषयांबाबत खरोखर गांभीर्य आहे का? असा प्रश्न माझ्यासारख्या सर्वसामान्य नागरिकास पडतो. विविध दुर्घटनांमुळे नागरीप्रशासन व लोकनियुक्त सरकार अग्निसुरक्षेबाबत सजग नसल्याचे प्रकर्षाने समोर येते.

या संदर्भात खालील काही मुद्दे उपस्थित होतात.

१. इमारती सभोवतालची मोकळी जागा व परिसर रचना : रहिवासी इमारतीचा भाग व व्यावसायिक दुकाने पूर्णतः वेगळे असावेत. झोपडपट्ट्यांच्या ठिकाणी एकमजली वा दुमजली झोपड्यांमध्ये तळमजल्यावर व्यावसायिक दुकाने प्रस्थापित केली जाऊन त्यावरील पोटमाळ्यावर राहण्याच्या गैरसोयीमुळे बरीचशी कुटुंबे वास्तव्य करीत असतात. पुढच्या बाजूला दुकान व पार्टीशन करून मागील बाजूस कुटुंब राहते अशा लोकांना दुकानाच्या मुख्य दरवाजाशिवाय बाहेर जाण्यासाठी दुसरा पर्यायी मार्ग नसतो. तरी मुंबईतील दुकाने व व्यवस्थापने यांची तपासणीची जबाबदारी असलेल्या महानगरपालिकेच्या लायसन्स डिपार्टमेंटकडून काटेकोरपणे तपासणी करण्याची भूमिका निभावली जाते का? बऱ्याच वेळी बहुमजली इमारतीमध्ये देखील तळमजल्यावर व्यावसायिक दुकाने, पहिल्या दुसऱ्या माळ्यावर वाहने पार्किंग तसेच ऑफीस / दुकाने यांना महानगरपालिका व अग्निशमनदल यांनी परवाने दिलेले पाहावयास मिळतात. रहिवासी इमारतीमध्ये व्यावसायिक आस्थापने, दुकाने व व्यवस्थापनाला परवानगी देताना प्रत्येक इमारतीमध्ये २ स्वतंत्र जिने परस्परविरुद्ध बाजूला असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण इमारतीमध्ये आगीसारखी दुर्घटना घडल्यास इमारतीच्या वरील माळ्यांवरील व्यक्तींना दुसऱ्या जिन्याने सुरक्षित ठिकाणी जाता येणे शक्य होईल. तसेच सामाजिक भान ठेवून इमारतीच्या मोकळ्या जागेमध्ये वाहने अवास्तव पार्क करून ठेऊ नयेत व इमारतीच्या आसपासची, भोवतालची जागा (६ मीटर) पूर्णपणे मोकळी ठेवावी. जेणेकरून अग्निशमन वाहने सहजपणे व विनाअडथळा दुर्घटनास्थळी पोहोचून अग्निशमन व विमोचनाचे कार्य तत्काळ सुरू करतील. ज्यामुळे जीवितहानी टाळता येईल व वित्तहानी कमी होण्यास मदत होईल. इमारतीतील रहिवाशांनी या सामाजिक बांधिलकीचे काटेकोरपणे पालन केल्यास हे शक्य आहे.

२. इमारतीच्या अंतर्गत भागातील बाल्कनी, कॉरीडोअर, लिफ्टलॉबी व स्टेअरकेस : या मोकळ्या जागा बहुतांशी सर्वच रहिवासी व व्यावसायिक इमारतीमध्ये असे पाहावयास मिळते की, प्रत्येक मजल्यावरील कॉमन कॉरीडोअर, पॅसेज व लिफ्टलॉबीमध्ये त्या मजल्यावरील रहिवासी स्वतःच्या घरातील अतिरिक्त किंवा टाकाऊ असलेले सामान साठवून ठेवण्यासाठी आपल्या हक्काच्या जागा आहेत असे सर्वमान्य केलेले आहे. इमारतीतील मजल्यास, एखाद्या घरास आग लागल्यास सदर आग घराबाहेर पसरली, तर कॉरीडोअर, पॅसेजमध्ये ठेवलेले लाकडी सामान, चपलांचे स्टँड, गैरसोयीचे फर्निचर इत्यादी वस्तू पॅसेजमधून आग पसरविण्यास मदत करतात. तसेच बऱ्याचवेळी असे देखील निदर्शनास येते की, इमारतीतील कॉरीडोअर, पॅसेजमध्ये धातूच्या तारा अथवा दोऱ्या बांधून सदर भाग कपडे वाळविण्यासाठी वापरला जातो. सदर कपडे वाळत घालण्याच्या छत किंवा भिंतीवरून इलेक्ट्रिक वायर किंवा केबल गेलेल्या असतात ज्या गोष्टी आगीचा प्रसार करण्यास प्रामुख्याने हातभार लावतात. तरी सर्व




रहिवाशांना असे आवाहन करावेसे वाटते की, घरातील अतिरिक्त सामान कॉरीडोअर, पॅसेज, लिफ्टलॉबी व जिने यामध्ये ठेवून अडथळा निर्माण करू नये.

३. इमारतीतील अग्निशमन यंत्रणा व त्यांची कार्यक्षमता : मुंबईची जमिनीशी समांतर असणारी वाढ गेल्या काही वर्षांत पूर्णतः खुंटलेली आहे. बहुमजली इमारतींमध्ये वास्तव्यास असलेल्या रहिवाशांना स्वतः, स्वतःचे कुटुंब व इतर लोकांच्या सुरक्षिततेबाबत कोणतेही देणेघेणे नसणे व सुरक्षिततेबाबत असलेले सामाजिक भान याचा अभाव दिसतो. त्यामुळे बहुमजली इमारतींच्या अंतर्गत अग्नी सुरक्षिततेची साधने व्यवस्थित कार्यरत आहेत किंवा नाही? इमारतीच्या विद्युत डक्ट / शाफ्ट प्रत्येक माळ्यावर सिल केलेले आहेत किंवा नाहीत? अग्निशमन पंप कार्यरत आहेत किंवा नाहीत? प्रत्येक माळ्यावरील हायड्रन्ट पॉइंट, होजरिल, फायर अलार्म चालू स्थितीत आहेत किंवा नाही याबाबत पूर्णतः अनास्था आढळून येते. इमारतीच्या प्रत्येक माळ्यावरील विद्युत डक्ट म्हणजे घरातील अडगळीचे सामान साठवून ठेवण्याची प्रत्येकाची हक्काची जागा असे समजताना त्यामागील धोके कधीच गांभीर्याने का घेत नाही? प्रत्येक मजल्यावरील कॉरीडोअर मधून जिन्यामध्ये उत्तरण्यापूर्वी लावण्यात आलेले अग्नी प्रतिरोधक लाकडी दरवाजे बऱ्याचदा काढलेले आढळतात किंवा त्याची स्वयंचलित बंद होण्याची व्यवस्था नादुरुस्त अवस्थेत असते.

४. टेरेस व रिफ्यूज एरिया : आजकाल इमारतीमध्ये ओपन टेरेस व रिफ्यूज एरिया हा हाऊसिंग सोसायट्यांचा कम्युनिटी हॉल किंवा एन्टरटेनमेन्ट हब म्हणून वापरण्याची प्रथा प्रचलित झाली आहे. इमारतीमध्ये आगीसारख्या दुर्घटना घडल्यास मजल्यावरील रहिवाशांच्या सुरक्षिततेचे ठिकाण म्हणून टेरेस व रिफ्यूज एरिया विनाअडथळा पोहोचण्यासाठी खुला व सुरक्षित असणे अत्यंत गरजेचे आहे; परंतु इमारतीचे पदाधिकारी व कार्यकारी मंडळ सदर जागा व्यापणे हा आपला जन्मसिद्ध अधिकार आहे अशा थाटातच वावरत असतात व आपल्या अशा निर्बुद्ध वर्तनाने प्रत्येक रहिवाशांच्या जीवास धोका निर्माण करत असल्याची किंचितही जाणीव त्यांच्या मनास स्पर्श करीत नाही. इतक्या सर्वांच्या भावना बोथट झाल्या आहेत का? त्यामुळे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे की स्वतःच्या प्रतिष्ठेचे प्रदर्शन करण्यासाठी इंटेरीअर डेकोरेशन व फर्निचरवर जसा लाखो रुपयांचा खर्च केला जातो तशीच दक्षता घरामध्ये पोर्टेबल फायर एक्सटिंगविशर, स्मोक डिटेक्टर, स्प्रिंकलर लावण्यासाठी घ्यावी. ९०% आगीच्या घटना या शॉर्ट सर्किटमुळे घडलेल्या असतात. इमारतीतील प्रत्येक घरात आधुनिक उपकरणे वापरताना इलेक्ट्रिक लोड किती आहे? दहा वर्षांमध्ये रिवायरींग करणे इतक्या साध्या गोष्टींचे भान देखील स्वतःला सुशिक्षित व उच्चभ्रू मानणाऱ्यांनी ठेवले पाहिजे.

नगरविकास खाते व सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या समन्वयाने दर ६ महिन्याने फायर ऑडिट आणि १ वर्षांनी इलेक्ट्रिकल ऑडिट करण्याचे नियम काटेकोरपणे पाळले जाण्यासाठी अंकुश ठेवला पाहिजे. या व्यतिरिक्त झाड पडणे, पूरस्थिती, लॅन्ड स्लाइड, हाऊस कोलॅप्स, लिफ्ट, मॅनहोल, फटाके यामुळे होणाऱ्या दुर्घटना याकरीता राज्यशासनाच्या यंत्रणा तोकड्या पडतात. अग्निशमन दल अत्याधुनिक होत असले तरी त्यांच्याकडे ९० मीटर उंची पर्यंत म्हणजे साधारणतः २८ मजल्यापर्यंतच पोहोचणारी लेंडर, ५५ मीटरचा वॉटर टॉवर, रिमोट कंट्रोल रोबोट उपलब्ध आहेत ते हाताळताना त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. रेस्क्यू आणि फायर फायटींग ड्रोन, फायर सर्व्हिस सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी अभ्यासू फायर फायटर प्रयत्नशील आहेत.

टोलेजंग इमारती, कोस्टल रोड, फिवे, स्काय वॉक, मेट्रो इत्यादींचा ध्यास घेतलेल्या प्रशासकीय यंत्रणांनी आपत्कालिन सेवा देणाऱ्या अग्निशमनदल, रुग्णवाहिका, पोलीस यांच्यासाठी स्वतंत्र मार्गिका उपलब्ध करून देणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच नागरिकांनी आपले घर व इमारतीतील विद्युत उपकरणे व स्वयंचलित यंत्रणा, एल.पी.जी. गॅस / पी.एन.जी. गॅसलाईन तसेच कायम स्वरुपी अग्निशमन या याची गव्हर्नमेंट अप्रूव्हड लायसन्स एजन्सीकडून वारंवार तपासणी तथा योग्यवेळी दुरुस्ती व परिक्षण करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

आजच्या युगामध्ये शाळा, महाविद्यालये, सरकारी व खासगी व्यवस्थापनामध्ये अग्नीसुरक्षा व आपत्कालिन व्यवस्थापन प्रशिक्षण सर्वांना कायद्याने सक्तीचे करावयास पाहिजे. असे झाल्यास दुर्घटनेच्यावेळी नागरिक लोकनियुक्त प्रतिनिधी, प्रशासकीय यंत्रणा व लोकनियुक्त सरकार यांची एकमेकांवर चिखलफेक करून आपली जबाबदारी झटकण्याच्या वृत्तीला आळा बसेल जेणेकरून स्वहित, समाज व देशाच्या प्रगतीसाठी हातभार लागेल यात तिळमात्र शंका नाही.

# प्रसिद्ध डॉक्टरच्या आत्महत्येप्रकरणी महिलेला पोलीस कोठडी





सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांनी राहत्या घरी १८ एप्रिल रोजी आत्महत्या केली. डोक्यात गोळी घालून घेत त्यांनी आयुष्य संपवलं. या प्रकरणात सदर बाजार पोलिसांनी वळसंगकर रुग्णालयात काम करणाऱ्या मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेला अटक केली होती. या महिलेला सोलापूर सत्र आणि दिवाणी न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी ठोठावली. न्यायदंडाधिकारी दीपक कंखरे यांनी हा निर्णय दिला.

कामावरुन काढून टाकल्यानंतर मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेने डॉ. शिरीष वळसंगकर यांना पत्र पाठवले होते. या पत्रात कामावर परत घेतले नाही तर आत्महत्या करेन, अशी धमकी दिली होती. हे पत्र मिळाल्यानंतर डॉ. शिरीष वळसंगकर यांनी १८ एप्रिल रोजी घरी येऊन रात्री साडेआठ वाजता स्वतःचे परवाना असलेले शस्त्र हाती घेतले आणि डोक्यात गोळी घालून घेत आत्महत्या केली. आत्महत्या करण्याआधी डॉक्टरांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली होती. या चिठ्ठीत मनीषामुळे टोकाचे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख होता. ही चिठ्ठी बिघतल्यानंतर पोलिसांनी चौकशी केली आणि मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेला अटक केली. यानंतर महिलेविरोधात पोलिसांनी पुढील कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

नेमके काय घडले ?

प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर १८ एप्रिल रोजी रात्री घरी आले. ते हात धुण्याच्या निमित्ताने बेडरूमच्या बाथरूममध्ये गेले. तिथेच त्यांनी डोक्यात गोळी घालून घेत आत्महत्या केली. गोळीबाराचा आवाज ऐकून घरातील सर्वांनी डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या बेडरूमच्या दिशेने धाव घेतली. बाथरूमच्या जमिनीवर डॉक्टर रक्ताच्या थारोळ्यात पडल्याचे बघून घरातल्या सर्वांनाच धक्का बसला. डॉक्टरांना तातडीने वळसंगकर रुग्णालयात नेण्यात आले.

तिथे डॉक्टरांनी तपासणी केली आणि न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांचा मृत्यू झाल्याचे जाहीर केले. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी हॉस्पिटलमध्ये आले. यानंतर लगेच तपासाला सुरुवात झाली.

डॉ. अश्विन वळसंगकर यांनी केली तक्रार

डॉ. अश्विन शिरीष वळसंगकर यांनी प्रसिद्ध न्यूरोसर्जन डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येप्रकरणी मनीषा महेश मुसळे उर्फ मनीषा माने नावाच्या महिलेबाबत संशय व्यक्त केला. यानंतर पोलिसांनी तपास केला आणि तातडीने कारवाई केली.

# उमर अब्दुल्लांचे विमान दिल्ली ऐवजी राजस्थानला पोहचले


## दिल्लीत लँडिंग स्पेस नसल्यामुळे झाला मनस्ताप

नवी दिल्ली : जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला यांना विमान कंपनीच्या गैरव्यवस्थापनाचा चांगलाच फटका बसला. अब्दुल्ला जम्मूहून दिल्लीसाठी निघाले होते. परंतु, दिल्लीत विमानांची गर्दी असल्यामुळे त्यांचे विमान राजस्थानच्या जयपूर येथे लँड करावे लागले. त्यामुळे संतप्त झालेल्या अब्दुल्लांनी रात्री १ वाजता ट्विट करत संताप व्यक्त केला आहे.

जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री उमर अब्दुल्ला शनिवारी रात्री इंडिगोच्या विमानाने दिल्लीला दिल्लीला निघाले होते. परंतु दिल्ली विमानतळावर विमानांची गर्दी असल्याने विमान उतरण्यासाठी जागा उपलब्ध नव्हती. त्यामुळे विमान दिल्लीत उतरू शकले नाही आणि विमान थेट जयपूरला वळवण्यात आले. तिथे रात्री उशिरा १ वाजता विमान पोहचले.

विमानातून उतरल्यानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचा पारा चढला. त्यांनी एक सेल्फी शेअर करत सोशल मीडियावरून संतप्त भावना व्यक्त केल्या. दिल्ली विमानतळ म्हणजे एक संपूर्ण गोंधळाची परिस्थिती आहे. जम्मूहून निघाल्यानंतर ३ तास हवेत फिरवून आम्हाला जयपूरला वळवलें. आता मी विमानाच्या जिन्यावर उभा राहून थोडी ताजी हवा घेत आहे. इथून कधी निघणार, काहीच कल्पना नाही. असे अब्दुल्ला यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान, शनिवारी श्रीनगर विमानतळावर खराब हवामानामुळे ६ विमाने रद्द करण्यात आली होती. यामुळे जम्मू विमानतळावरही अनेक प्रवासी अडकले होते. तिथे विमानांच्या उड्डाणांना विलंब व रद्द होण्याच्या प्रकारांमुळे पूर्ण गोंधळाचे वातावरण होते. त्यामुळे शेकडो प्रवासी अडकल्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडली होती.

# मुख्यमंत्र्यांच्या जनता दरबारात ६२६ अर्ज



नागपूर: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुख्यमंत्री सचिवालयात आयोजित जनता दरबारात जनतेच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांच्या निराकरणासाठी विविध विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित केल्या. त्यांनी या जनता दरबारात एकूण ६२६ निवेदने स्वीकारली.

महिला व बाल विकास विभागाच्या पिंक ई-रिक्षा वितरण कार्यक्रमाला उपस्थिती लावल्यानंतर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना भेटण्यासाठी व आपल्या समस्या मांडण्यासाठी नागपूरच्या विविध भागातील नागरिकांनी येथील सिव्हिल लाईन्स परिसरातील हैदराबाद हाऊस या मुख्यमंत्री सचिवालयात एकच गर्दी केली होती. श्री. फडणवीस यांची दिव्यांग, महिला, विविध सामाजिक संस्था, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या समस्या सांगून निवेदन दिले. म्हणणे ऐकून घेत मुख्यमंत्री यांनी जनतेच्या समस्या सोडवण्याबाबत आश्वस्थ केले. दुपारी १२ ते ३ दरम्यान या जनता दरबारात जवळपास २ हजार नागरीक सहभागी झाले होते तर ६२६ निवेदन प्राप्त झाली आहेत.

विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह, ऊर्जा विभाग, सार्वजनिक बांधकाम, भूमि अभिलेख, समाज कल्याण आदी विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

# आईस्क्रीम कारखान्यातील धक्कादायक घटना, कामगारांना दिली अशी वागणूक की प्राणीही घाबरावेत !

छत्तीसगड : छत्तीसगडमधील कोरबा जिल्ह्यात आईस्क्रीम कारखान्यात एक धक्कादायक घटना घडली. कारखान्याच्या मालकाने चोरीच्या संशयावरुन दोन कामगारांना अमानवी अशी वागणूक दिली. मालकाचे कृत्य एवढे भयानक होते की ते बघून जंगली प्राणीही घाबरावेत. चोरीच्या संशयावरुन आईस्क्रीम कारखान्याच्या मालकाने दोन कामगारांना अर्धनग्न केले. कपडे काढून कामगारांची अंगझडती घेण्यात आली. काही सापडले नाही म्हणून चोरी करुन पैसे कुठे लपवलेत ? असा प्रश्न विचारण्यात आला. खरं बोलत नाहीत, असं वाटलं म्हणून मालकाने कामगारांची नखं उपटली आणि त्यांना बेदम चोपले. हे कमी म्हणून मालकाने दोन्ही कामगारांना विजेचे शॉक दिले. गंभीर जखमी झालेले कामगार बेशुद्ध पडले त्यावेळी त्यांना मालकाने सोडून दिले. दोन्ही कामगारांना कामावरुन काढून टाकण्यात आले.

आपले सामान घेऊन कामगारांनी तातडीने राजस्थानमधील त्यांचे मूळ गाव गाठले. या ठिकाणी पोहोचल्यावर कामगारांनी स्थानिक पोलीस ठाण्यात कारखान्याच्या मालकाविरुद्ध तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेतला आणि तपास सुरू केला.

राजस्थानमधील भिलवाडा जिल्ह्यातील अभिषेक भांभी आणि विनोद भांभी हे दोघे छत्तीसगडमधील सिव्हिल लाइन्स पोलिस स्टेशन हद्दीतील खाप्रबत्ती भागात छोटू गुर्जरच्या आइस्क्रीम कारखान्यात नोकरी करत होते. एका कंत्राटदाराच्या माध्यमातून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. काम व्यवस्थित सुरू होते. पण कारखान्याचे मालक छोटू गुर्जर आणि त्यांचे सहकारी मुकेश शर्मा यांनी अभिषेक भांभी आणि विनोद भांभी या दोघांवर चोरीचा आरोप केला. यानंतर दोन्ही कामगारांना अमानवी वागणूक देण्यात आली. याआधी भांभी यांनी मालकाकडे वाहन कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी २० हजार रुपये मागितले होते. मालकाने पैसे देण्यास नकार दिल्यावर अभिषेक भांभी आणि विनोद भांभी यांनी नोकरी सोडत असल्याचे जाहीर केले. हे ऐकताच मालकाला राग आला. मालकाने त्याचे सहकारी मुकेश शर्मा याच्या मदतीने दोन्ही कामगारांवर दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. कामगारांनी ऐकावे म्हणून त्यांच्यावर चोरीचा आरोप करण्यात आला. यानंतर मालकाने दोन्ही कामगारांना अमानवी अशी वागणूक दिली. या वागणुकीमुळे गंभीर जखमी झालेले कामगार बेशुद्ध पडले त्यावेळी त्यांना मालकाने सोडून दिले. दोन्ही कामगारांना कामावरुन काढून टाकण्यात आले.

काम सुटताच अभिषेक भांभी आणि विनोद भांभी यांनी तडक राजस्थान गाठले आणि भिलवाडा जिल्ह्यातील मूळगावी पोहोचताच स्थानिक गावात पोलिसांकडे झिरो एफआयआर नोंदवली. या एफआयआरच्या आधारे पोलिसांनी पुढील तपास सुरु केला आहे. अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. पण काखान्यातील घटनेचा व्हिडीओ कोणीतरी शूट केला आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केला. हा व्हिडीओ व्हायरल झाला आणि पोलिसांनी मालकाविरुद्ध झिरो एफआयआर नोंदवली.

# कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात चार मराठी चित्रपट प्रदर्शित होणार

मुंबई : महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या वतीने फ्रान्समधील कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी तीन मराठी चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. यात 'स्थळ', 'स्नो फ्लॉवर' आणि 'खालिद का शिवाजी' या तीन मराठी चित्रपटांचा समावेश आहे. तर 'जुनं फर्निचर' या चित्रपटाची विशेष निवड करण्यात आल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री अँड आशिष शेलार यांनी दादर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत केली.

फ्रान्समध्ये येत्या १४ ते २२ मे २०२५ या कालावधीत कान चित्रपट महोत्सव संपन्न होणार आहे. कान या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा चार मराठी चित्रपटांची एन्ट्री झाली आहे. महामंडळामार्फत सन २०१६ पासून कान महोत्सवातील फिल्म मार्केटमध्ये मराठी चित्रपट पाठवले जात आहेत. मराठी चित्रपट आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचावा आणि जागतिक सिनेप्रेमींना मराठी चित्रपटाची भूरळ पडावी, हा यामागचा हेतू आहे. या चित्रपट निवडीसाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाने तज्ज्ञ परीक्षण समिती तयार केली होती. आदित्य सरपोतदार, निखिल महाजन, गणेश मतकरी, इरावती कर्णिक, अपूर्वा शालिग्राम यांचा यात समावेश होता.

स्थळ : भारतातील ग्रामीण भागातील पारंपारिक अरेंज मॅरेज व्यवस्थेवर भाष्य करणारा 'स्थळ' हा चित्रपट आहे. समाजात खोलवर रुजलेली पितृसत्ताक पद्धत, रंगभेद आणि सामाजिक दृष्टिकोन अशा अनेक गोष्टींवर या चित्रपटात प्रकाश टाकण्यात आला आहे. सचिन पिळगांवकर या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. अभिनेत्री नंदिनी चिकटे या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे. जयंत सोमलकर यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे.

स्नो फ्लॉवर : 'स्नो फ्लॉवर' या मराठी चित्रपटात मार्मिक, क्रॉसकंट्री कथा सांगणारा आहे. रशिया आणि कोकण या दोन वेगळ्या संस्कृतींना जोडणारा हा चित्रपट आहे. बर्फाळ सायबेरिया आणि हिरवेगार कोकण यांच्या विरोधाभासी पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट आहे. गजेंद्र अहिरे यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. विठ्ठल अहिरे, छाया कदम, वैभव मांगले आणि सरफराज आलम सफू हे कलाकार या चित्रपटात महत्त्वाच्या भूमिकेत आहेत.

खालिद का शिवाजी : राज मोरे यांच्या 'खालिद का शिवाजी' या चित्रपटात खालिद हा मुलगा मुस्लिम धर्मीय असल्याने त्याला इतर मुलं एकटं पाडतात. त्याचे निरागस डोळे मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा शोध घेतात, हे या चित्रपटात दाखवण्यात आलं आहे.

जुनं फर्निचर : महेश मांजरेकर अभिनीत आणि दिग्दर्शित 'जुनं फर्निचर' हा चित्रपट ज्येष्ठ नागरिकांच्या अस्तित्वावर भाष्य करणारा आहे. या चित्रपटात वृद्धापकाळात पोहोचल्यावर आपलीच मुले आपल्याला कशाप्रकारे नाकारतात आणि त्यामुळे होणारे हाल दाखवण्यात आले आहेत. अभिनेता भूषण प्रधान या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे.

# मुख्यमंत्री सचिवालयात लवकरच पीजीआरएस प्रणाली

नागपूर : विविध कार्यक्रमांमध्ये तसेच येथील सव्हिल लाईन्स परिसरातील मुख्यमंत्री सचिवालय-हैदराबाद हाऊसमध्ये प्राप्त होणारे जनतेचे अर्ज व निवेदनांवर सकारात्मक कार्यवाही होवून या अर्जाची सद्यस्थिती अर्जदाराला एसएमएसद्वारे कळण्यासाठी पब्लिक ग्रिव्हेन्सेस रिर्ड्रसल सिस्टिम (पीजीआरएस) ही ऑनलाईन प्रणाली लवकरच कार्यान्वित होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुख्यमंत्री सचिवालयात या संदर्भात बैठक झाली.

शासकीय कामकाजामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून जनतेला तात्काळ दिलासा देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे. यास अनुसरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दौऱ्यावेळी व येथील मुख्यमंत्री सचिवालयात विविध विभागांशी व विषयांशी संबंधित निवेदने, अर्ज व तक्रारी संबंधित विभागाकडे पाठवून त्यावर उचित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने पीजीआरएस ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री सचिवालयाच्या विशेष कार्याधिकारी आशा पठाण यांनी या ऑनलाईन प्रणाली विषयी सविस्तर सादरीकरण केले. या ऑनलाईन प्रणालीद्वारे प्राप्त निवेदने व अर्जांचे विभागनिहाय व तक्रारनिहाय वर्गीकरण करण्यात येईल. हे अर्ज व निवेदने स्कॅन करून संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल व त्याची माहिती एसएमएसद्वारे अर्जदाराला कळेल. संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येवून अर्जदाराचा अर्ज निकाली काढल्याबाबत अर्जदारास एसएमएसद्वारे माहिती मिळेल. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या ऑनलाईन प्रणालीबाबत समाधान व्यक्त केले. लवकरच ही सुविधा जनतेचा सेवेत रूजू होणार आहे.

बैठकीस विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह सार्वजनिक बांधकाम, भूमि अभिलेख, समाज कल्याण आदी विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

# रक्षामंत्री आणि मुख्यमंत्री यांना नवकार फाऊंडेशन तर्फे मंगल कलश समर्पित

छत्रपती संभाजीनगर: येथे नवकार फाऊंडेशनच्या माध्यमातून सकल जैन समाजाच्या तत्त्वावधानात आणि प.पू. गच्छाधिपती अभयदेवसुरीश्वरजी महाराज यांच्या आशीर्वादाने ९ एप्रिल रोजी विश्व नवकार दिवसानिमित्त भव्य नवकार महामंत्र जपानुष्ठान संपन्न झाले. जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जितो) परिवाराच्या,नवकार फाऊंडेशन, व सकल जैन समाज च्या आवाहनानुसार जगभरात १०८ देशांमध्ये एकाच वेळी नवकार महामंत्राचा जाप करून विश्वविक्रम प्रस्थापित करण्यात आला. या ऐतिहासिक आयोजनात छत्रपती संभाजीनगरने सक्रिय सहभाग नोंदवला.

प.पू. स्पष्टवक्ता सिद्धीसुधाजी म.सा. यांच्या सान्निध्यात झालेल्या या अनुष्ठानात २७ विशेष मंगल कलशांवर जपानुष्ठान करण्यात आले. यापैकी एक मंगल कलश भारताचे रक्षामंत्री मा. राजनाथ सिंह आणि दुसरे महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांना नवकार फाऊंडेशनच्या वतीने गुरुभक्त गौरव मुगदिया यांच्या हस्ते समर्पित करण्यात आले. या मंगल कलशांचा स्वीकार रक्षामंत्री आणि मुख्यमंत्री यांनी भावपूर्णपणे केला आणि विश्व नवकार दिवसाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नवकार फाऊंडेशन व जितो परिवाराचे आभार मानून अभिनंदन केले.



या प्रसंगी राजस्थानचे राज्यपाल मा. हरिभाऊ बागडे, आमदार प्रशांत बंब मेवाड नरेश लक्षराज सिंग,मा.अर्थ मंत्री डॉक्टर भागवत कराड,मंत्री अतुल सावे,राजु शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विश्व नवकार दिवसाच्या घोषणेसाठी आणि सक्रिय सहभागासाठी मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही विशेष आभार मानण्यात आले. हा कार्यक्रम भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर संभाजीनगरच्या जैन समाजासाठी अत्यंत गौरवास्पद ठरला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्या.साठी सकल जैन समाज चे अध्यक्ष राजेन्द्र दर्डा, जितो अध्यक्ष अनिलकुमार संचेती, नवकार फाऊंडेशन प्रकल्प प्रमुख रवी मुगदिया, अनिलकुमार संचेती, विलास साहूजी, संजय संचेती, विनोद बोकडिया, राजेश मुथा, अजित जैन, रवी लोढा, निलेश जैन, पंकज साकला, हितेश कांकरिया, प्रकाश कोचेटा, अभिजीत हिरप, पियुष कासलीवाल, विकास रायमाणे, अमित काला, संतोष पापडीवाल आणि

# छत्रपती संभाजीनगरमध्ये ७ मे रोजी 'मराठीचा गजर'

## २१ कविता संग्रहांसह पुस्तक प्रकाशन, काव्य स्पर्धेचेही आयोजन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने तमाम मराठी मनांची मान अभिमानाने उंचावली आहे. मराठी भाषेच्या सक्षमीकरणासाठी मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्था नेहमीच प्रयत्नशील असते व भाषा सक्षमीकरणासाठी अनेकाविध उपक्रमांचे नियमितपणे आयोजन करत असते. बुधवारी ७ मे २०२५ रोजी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र सभागृह, छत्रपती संभाजीनगर येथे 'गौरव अभिजात मराठी २०२५' या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धा, २१ कवितासंग्रहाचे प्रकाशन आणि अभिजात मराठी विशेषांक प्रकाशन, तसेच पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित 'गौरव अभिजात मराठी २०२५' या भव्य प्रकाशन समारंभाच्या मुख्य आयोजक व उद्घाटक प्रा. डॉ. पद्मा जाधव-वाखुरे, शासकीय अध्यापक महाविद्यालय, परभणी या आहेत. अध्यक्ष शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे असतील. मार्गदर्शक प्रसिद्ध शिवव्याख्याते, कीर्तनकार आणि संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक डॉ. बालाजी जाधव, प्रमुख अतिथी संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते ए. बी. पठाण, नरेश शेळके, सचिव, बुलडाणाच्या यशवंतराव चव्हाण सेंटरचे सचिव नरेश शेळके, विश्वस्त प्रमुख अरविंद उरकुडे, अशोक लांडगे, संस्थापक अध्यक्ष राहुल पाटील, मुख्य परीक्षक, कोषाध्यक्ष सविता पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दुपारच्या सत्रात राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धा होणार असून, या स्पर्धेत दिग्गज ४० कवी, कवयित्री सहभागी होणार आहेत. विजेत्यांना प्रथम, द्वितीय, तृतीय अनुक्रमे रुपये ३०००, २०००, १००० रोख रक्कम तसेच १० उत्तेजनार्थ ५०० रुपये रोख सोबत सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व विशेषांक देण्यात येणार आहे.

मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्थेतर्फे सहप्रशासक वैशाली अंड्रस्कर, स्वाती मराडे, प्रा. तारका रुखमोडे, शर्मिला देशमुख घुमरे, संग्राम कुमठेकर, हंसराज खोब्रागडे, प्रतिमा नंदेश्वर, वृंदा करमरकर कार्यक्रमास सहकार्य करीत असून, कार्यक्रमाच्या आयोजनासाठी छत्रपती संभाजीनगर येथील गौरव अभिजात मराठी आयोजन समितीतर्फे ज्येष्ठ साहित्यिका डॉ. पद्मा वाखुरे -जाधव, उद्योजक विजय शिर्के, कवयित्री वर्षा मोटे, व्याख्याते अकिल पठाण, ज्येष्ठ कवी विष्णू संकपाळ व प्रशांत ठाकरे सिलवासा हे आयोजन समितीचे पदाधिकारी परीश्रम घेत आहेत, अशी माहिती मराठीचे शिलेदार बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल पाटील व सचिव पल्लवी पाटील यांनी दिली.

# २५३ वर्षाची परंपरा असलेल्या भवानीमातेच्या यात्रेस २२ पासून सुरुवात



छत्रपती संभाजीनगर –

छत्रपती संभाजीनगर लागत असलेल्या मुकुंदवाडी या गावातील २५३ वर्षाची परंपरा असलेल्या भवानी मातेच्या यात्रेला मंगळवार दिनांक २२ एप्रिल पासून सुरुवात होणार असल्याचे आमदार नारायणराव कुचे यांनी सांगितले,या वेळी रामचंद्र नरोटे ,बाबासाहेब डांगे ,भाऊसाहेब जगताप, संतोष शिंदे, रतन साळवे, किशनराव ढुबे, मोतीलाल जगताप, यात्रा पंच कमिटी व मोठ्या संख्येने मुकुंदवाडी गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

२२ एप्रिल पासून यात्रेला सुरुवात होणार असून २४ एप्रिल पर्यंत ही यात्रा चालणार आहे. विविध कार्यक्रमाचे आयोजन मुकुंदवाडी गाव यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

पुढे बोलताना आमदार कुचे यांनी यात्रेविषयी माहिती देताना दिनांक २२/०४/२०२५ मंगळवार रोजी सकाळी ५ वाजता देवीचा महाभिषेक व आरती दुपारी १२.३० वाजता काकडा आरती, दुपारी २.३० वा. देवीचा भंदे खेळण्याचा कार्यक्रम. सायंकाळी ५.३० वाजता नवसाच्या बारागाड्य ओढण्याचा कार्यक्रम व नवसाचा त्रिशुल टोचण्याचा कार्यक्रम, संध्याकाळी ७.०० वाजता देवीचा गोंधळ व आरती, रात्री ८.३० वाजता देवीची पालखी, छबीना मिरवणूक, भवानीदेवी मंदिरापासून मारुती मंदिरा पर्यंत, रात्री कलगीतुरा सामना व समाज प्रबोधनाचा कार्यक्रम होईल. दिनांक २३/०४/२०२५ बुधवार रोजी दुपारी ३ ते ७ वाजेपर्यंत महाप्रसादचा कार्यक्रम संध्याकाळी ७.३० ते १० वाजेपर्यंत युवाचार्य ह.भ.प. प्रभाकर महाराज शास्त्री यांचा किर्तनाचा कार्यक्रम होईल. रात्री ८ ते १० वाजता ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम.

# ओम जगद्गुरु जनशांती धर्म सोहळ्याचे ध्वजारोहण संपन्न

खुलताबाद प्रतिनिधी : क्षेत्र वेरूळ २०.रविवार रोजी सकाळी अकरा वाजता श्रीक्षेत्र वेरुळ येथे जनार्दन स्वामी आश्रम तालुका खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजीनगर अक्षय तृतीया निमित्ताने वार्षिक ओम जगद्गुरु जनजांती जन्मस्थळ या सोहळाव्याचे २० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराज यांच्या कृपाशीर्वाद व उत्तर अधिकारी आध्यात्मिक शिरोमणी जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या प्रेरणेने व प्रमुख उपस्थितीत अक्षय तृतीया निमित्त वार्षिक ओम जगद्गुरु जन शांती धर्म सोहळा २८ एप्रिल ते ५ मे या कालावधी श्री क्षेत्र वेरूळ येथे होणार आहे . या सोहळ्याची पूर्व तयारीचा आज शुभारंभ झाला यावेळी मुख्य ध्वजारोहण विधान परिषदेचे आमदार श्री संजय केनेकर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण झाले नंतर सत्संगामध्ये महंत सेवागिरी महाराज व जगद्गुरु स्वामी शांतिगिरी महाराज यांनी भाविकांना मार्गदर्शन केले प्रास्ताविक नागेश्वर नंद महाराज यांनी केले ह्यावेळी आश्रामिय सर्व संत उपस्थित होते ध्वजारोहण



सोहळा संपन्न करण्यासाठी . राजेंद्र पवार, शिवां भाऊ अंगुलगावकर, रंगनाथ ठुबे मामा, जनार्दन अण्णा रिठे, एकनाथ दादा होळकर, राजू चव्हाण व संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व तालुका सेवकांनी विशेष परिश्रम घेतले दिनांक २८ तारखेला शुभारंभ होत असलेल्या अक्षय तृतीयेच्या या सोहळ्यामध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे अशी आव्हान जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने राजेंद्र पवार यांनी केले यावेळी जय बाबाजी भक्त परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. भव्य अशी बाबाजी पालखीची मिरवणूक गावातून काढण्यात आली यामध्ये पाडळसा येथील. महिलांनी डोक्यावर एकच रंगाचा साड्या घालून मिरवणुकी सहभागी झाली तरी विद्यार्थ्यांनी या मिरवणुकीमध्ये लेझीम खेळत व ढोल वाजवत मिरवणुकीत सामील झाले.

यावेळी श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी बाबाजी सुद्धा मिरवणुकीत सामील झाले होते

# मराठा प्रतिष्ठानचा घोसला गावातील उपक्रमात ४२ गावांना पाण्याच्या टाक्या

सोयगाव,दि.२० एप्रिल - उन्हाच्या कडाक्यात नागरिकांच्या घशाची कोरड दूर करण्यासाठी मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान पाटील गव्हांडे यांनी शनिवारी मान्यवरांच्या हस्ते ४२ गावांसाठी पिण्याच्या पाण्याच्या एक हजार व पाचशे लिटर्सच्या पाचशे साठवण टाक्या मोफत वाटप करून दिलासा दिला



शनिवारी दुपारी एक वाजता झालेल्या घोसला गावातील या कार्यक्रमात डॉ.रुपेश पाटील(दीपस्तंभ जळगाव)ओमकार गिरी महाराज(मुरडेश्वर संस्थान) मुंबई सायबर सेल चे उपनिरीक्षक निवृत्ती बावसकर,माजी उपसभापती चंद्रकांत पाटील,संजय पाटील,मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान पाटील गव्हांडे,सरपंच गणेश माळी,प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे,तालुकाध्यक्ष विजय चौधरी,ग्रामपंचायत सदस्य सोमु तडवी,माजी सरपंच सुरेखा तायडे(गलवाडा) आदींची प्रमुख उपस्थिती होती प्रस्तवविकात सोपान पाटील गव्हांडे यांनी समाजाचे देणे लागतो त्यासाठी जनसेवा हीच ईश्वर सेवा हा उद्देश बाळगून हा उपक्रम राबविला असल्याने सांगितले डॉ.रुपेश पाटील यांनी खेडेगावात शांतता काय असते हे पहायचे असेल तर घोसला या पावन भूमीत या असे सांगून हा स्तुत्य उपक्रम असल्याचे सांगितले मुख्याध्यापक संजय पाटील यांनी सूत्रसंचालन केले दरम्यान तालुक्यातील ४२ गावांना मान्यवरांच्या हस्ते पाचशे टाक्या वाटप करण्यात आल्या ऐन पाणी टंचाईच्या छायेखाली असलेल्या गावांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व्हावी यासाठी हा उपक्रम राबविण्यात आल्यामुळे या गावातील नागरिकांना दिलासा मिळाला आहे यावेळी मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे,तालुकाध्यक्ष विजय चौधरी, प्रमोद वाघ, ज्ञानेश्वर गवळी,ज्ञानेश्वर युवरे,गणेश गवळी,अप्पा वाघ,गणेश तायडे,अमोल बोरसे,संदीप गव्हांडे,संदीप पाटील,समाधान गव्हांडे,चरण वाघ,आबा कोळी,एकनाथ गवळी,बंडू बावसकर,आदींनी पुढाकार घेतला होता.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४३१००५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४३१००३ येथे प्रसिध्द केले.

**• संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

**•Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** •Email : **attalsanket2023@gmail.com** •**RNI No. MAHMAR/2023/87816**